# प्रेसनोट

दिनांक २८/०९/२०२०

**पोलीस स्टेशन भोकर जि. नांदेड येथील सहा.पोलीस उप निरीक्षक नागोराव गोविंदराव आत्राम यांनी १५०००/- रुपये लाचेची मागणी केल्या बाबत नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल**

दिनांक २१/०९/२०२० रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, "यातील लोकसेवक नागोराव गोविंदराव आत्राम हे तक्रारदार यांचे विरूध्द पो. स्टे. भोकर येथे दाखल गुन्हयात सदर गुन्हयाचे तपासीक अधिकारी यांचेकडून तपासात मदत मिळवून देणे करीता १५,०००/- रु. लाचेची मागणी करीत आहेत".

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक २२/०९/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक नागोराव गोविंद आत्राम यांनी तक्रारदार त्यांचे विरूध्द पो.स्टे. भोकर येथे दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासात मदत मिळवून देण्याकरीता १५,०००/- रू. लाचेची मागणी करून लाच मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन त्यांचे विरूध्द पोलीस ठाणे भोकर येथे गु.र.नं. ३९८/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करून तपास पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी , लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री. विजय डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राजेश पुरी पोहेकॉ संतोष शेटे, पोना एकनाथ गंगातिर्थ, पोना दर्शन यादव, पोना अनिल कदम यांनी पार पाडली आहे

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :- १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२-२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

मा.संपादक, दैनिक ..................................................,
कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner